# माजी विद्यार्थी यशोगाथा

## जुनेद खान सलीम खान, आंतरराष्ट्रीय दिव्यांग फुटबॉलपटू ( भारत स्पेशल ऑलंपिक )


जुनेद खान सलीम खान हा मंदबुद्धी व शारीरिक अपंग विद्यालय अमरावती या शाळेचा माजी विद्यार्थी असून जिल्हास्तर, राज्यस्तर, देशपातळी आणि आंतरराष्ट्रीय स्थरावर हँडबॉल, फुटबॉल, क्रिकेट स्पर्धेमध्ये मोलाची कामगिरी याने केली आहे. लॉस एंजल्स कॅलिफोर्निया अमेरिका येथे तर राष्ट्रीय स्पर्धेसाठी भारताच्या फुटबॉल संघाचे प्रतिनिधित्व याने केले आहे. या स्पर्धेत जुनेद खान हा एकमेव महाराष्ट्रीयन खेळाडू होता. ही अमरावतीसाठी अतिशय गर्वाची बाब आहे.







**गौरव मालक हा डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालय अमरावती या शाळेचा माजी विद्यार्थी असून, तो सध्या राज्यस्तरावर पत्रकारिता या क्षेत्रामध्ये कार्यरत आहे.** मुंबई येथील कार्यक्रमादरम्यान मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समवेत गौरव मालक.



# दिव्यांग शाळेतील व्यक्ती विशेष

## मूकबधिरांसाठी द्विभाषिक तज्ज्ञ श्री निरज तिवारी

श्री निरज तिवारी, विशेष शिक्षक (नूतन मूकबधिर विद्यालय अमरावती ) यांनी डिप्लोमा इन इंडियन साइन लैंग्वेज इंदोर येथून पूर्ण केला आहे. श्री तिवारी यांना महाराष्ट्रातील अनेक जिल्हयातील विविध सरकारी कार्यक्रमांमध्ये, सरकारी कार्यालयामध्ये, निवडणुकांमध्ये, पोलीस तपास कामासाठी जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालय आणि अनेक सरकारी / खाजगी संस्था येथे मूकबधिरांसाठी द्विभाषिक तज्ज्ञ म्हणून काम करण्यासाठी सन्मानाने बोलाविले जाते. महाराष्ट्रातील मूकबधिरांसाठी द्विभाषिक तज्ज्ञ म्हणून अत्यंत मोजक्या द्विभाषिक तज्ज्ञांमध्ये श्री तिवारी यांची गणना होते. दिव्यांग क्षेत्रामधील श्री तिवारी यांचे कार्य अतिशय बहुमोल आहे.






## श्रीमती भावना द. पसारकर मुख्याध्यापिका
## स्व. लक्ष्मीकांत पसारकर मूकबधिर विद्यालय, अमरावती

श्रीमती पसारकर यांना महिला सक्षमीकरण आणि दिव्यांग क्षेत्रामध्ये केलेल्या कार्यामुळे अनेक शासनमान्य संस्था आणि खाजगी संस्था यांचे कडून विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. अमरावती महानगरपालिका बाल कल्याण समितीतर्फे माननीय सिंधुताई सपकाळ यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच माहिती व जनसंपर्क महा संचनालय महाराष्ट्र शासन यांच्या महामित्र उपक्रमातील विशेष सहभागाबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कडून सन्मानित केले . महिला आणि दिव्यांगाप्रति असलेली त्यांची सामाजिक बांधिलकी आणि केलेले कार्य अतिशय कौतुकास्पद आहे.






## श्री मकरंद अनंतराव बक्षी - मुख्याध्यापक, निवासी अंध विद्यालय, चिखलदरा

श्री मकरंद अनंतराव बक्षी हे मुख्याध्यापक पदावर कार्यरत असून मेळघाट सारख्या दुर्गम भागामध्ये दिव्यांगांसाठी अतिशय प्रेरणादायी कार्य करत आहेत. स्वतः दिव्यांग असलेले श्री बक्षी सर हे एक उत्तम प्रशासक म्हणून गेले तीस वर्षे अविरत सेवा करत आहेत.

पुरस्कार-

**1. महाराष्ट्र शासनाचा दिव्यांग राज्य शिक्षक पुरस्कार 2019 साठी निवड**

**2. ऋणमोचक सामाजिक संस्था नाशिक यांचे तर्फे महाराष्ट्र रत्नभूषण पुरस्कार 2020.**

**श्रीमती निर्मल काळे - काळबांडे** विशेष शिक्षिका, निवासी मतिमंद विद्यालय, अमरावती

M.A. (मराठी, पाली आणि बुद्धिझम)

सध्या Ph.D. काम चालू आहे (विषय : पश्चिम विदर्भातील मतिमंद विद्यार्थ्यांचे सामाजिक व शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन). त्यांच्या “आभाळ उसवते तेव्हा” या काव्यसंग्रहाला मातोश्री सूर्यकांता देवी रामचंद्र पोटे या संस्थेचा "उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कार" प्राप्त झाला आहे. त्यांचे विविध दैनिकांमध्ये लेख प्रकाशित तसेच अनेक समारंभ / कार्यक्रमांमध्ये व्याख्याने आणि कविता वाचन महिला सक्षमीकरण आणि दिव्यांग क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

**मतिमंद ग तुझं पोर**
**समजू नको 'तु जीवाला घोर....**
**असे आहे कितीतरी पोरं गं**
**शेजारीन सखे बाई....**

**त्याला "विशेष शाळेत" घाल,**
**तो हळूहळू शिकेल..**
**तिथे त्याच्याच सारखे मुलं गं**
**शेजारीन सखे बाई..**

**त्याला हसणार नाही कुणी ,**
**त्याला मारणार नाही कुणी..**
**त्याला म्हणशील तूच गुणी गं..**
**शेजारीन सखे बाई..**

**त्याला घरात ठेऊ नको बंद ,**
**जरी असेल मतीने मंद..**
**तोही समाजाचा गुलकंद गं**
**शेजारीन सखे बाई..**

**विशेष शाळेत घे गं धाव ,**
**त्याच्या गुणाला मिळेल वाव ..**
**"विशेष शाळेचे" होईल नांव गं**
**शेजारीन सखे बाई..**

**जरी असेल कमी वय..**
**नको वाटून घेऊ भय .**
**विशेष शिक्षकांची कय-कय गं**
**शेजारीन सखे बाई..**





**श्रीमती अर्चना रामदास वडवाले**

मुख्याध्यापिका, निवासी मतिमंद विद्यालय,
आसेगाव, पूर्णा, तालुका चांदूरबाजार, जिल्हा अमरावती.

श्रीमती अर्चना रामदास वडवाले यांची ग्रामीण भागातील शाळेतील एक संवेदनशील कवयित्री, आणि दिव्यांगाप्रती समर्पित सेवाभावी वृत्ती असणारी शिस्तबद्ध मुख्याध्यापिका अशी ओळख आहे.

# दिव्यत्व

**हात पाय नाहीत म्हणून ,मी कमजोर का समजावे ?**
**मिळालेल्या सुंदर माझ्या जीवनाला ,मी शाप का मानावे ?**

**घेऊनिया कुबडीचा सहारा, मी हिंमतीनेच जगावे,**
**संकटासमोर हारणारा भेकाड मी का म्हणून व्हावे ?**

**कमी माझ्यामध्ये असली जरी,दिव्य त्यास मी मानावे,**
**दिव्यत्वाचे तेज मी माझ्या विचारात कर्तृत्वाने आणावे.**

**नवीन प्रगतीची संधीची उन्नतीची कास मी धरावे,**
**आणि ह्यालाच मी स्वतःचा नसलेला दिव्य अंग म्हणावे.**

**बघितले आहे खूप, हातापायाने चांगले असणारे,**
**दुःखे ,संकटे आली, की घाबरून आत्महत्या करणारे.**

**घाबरट ,डरपोक माणसाला, सांगायचे आज मला,**
**एकदा तरी जगून बघ , जीवन जागेवर माझ्या चला.**

# किरण मेटकर

मेळघाटामधील आंतरराष्ट्रीय दिव्यांग महिला खेळाडू कुमारी किरण मेटकर या खेळाडूस दिव्यांग कल्याण निधी रक्कमेमधून आंतरराष्ट्रीय रेसिंग व्हीलचेअर खरेदीसाठी सात लाख तीस हजार रुपयाचे आर्थिक मदत करण्यात आली.









लोकमत

**दिव्यांग खेळाडू किरण मेटकर हिला जिल्हा परिषदेने दिला मदतीचा हात**

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती :** जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत पाच टक्के दिव्यांग कल्याण निधीमधून सन २०२१-२२ या वर्षात दिव्यांगांकरिता राबविण्यात येत आहे. या योजनेतर्गत राष्ट्रीय स्पर्धेतील दिव्यांग खेळाडू किरण मेटकर हिला बुधवार जिल्हा परिषदेमार्फत आंतरराष्ट्रीय रेसिंग व्हीलचेअर खरेदीसाठी ७ लाख ३० हजार रुपयांचा धनादेश सीईओ अविश्यांत पंडा यांनी प्रदान केला.

दिव्यांग कल्याण निधीमधून दिव्यांग राष्ट्रीय खेळाडू किरण मेटकर हिला आगामी आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी व्हीलचेअर रेसिंग खरेदीकरिता शासनाकडून मदतीचा हात देण्यात आला . किरण ही आगामी २०२४ मध्ये होणाऱ्या पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा पॅरिस (फ्रांस) येथे होणार आहेत. या स्पर्धेत ती भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. यावेळी अतिरिक्त सीईओ संतोष जोशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी राजेंद्र जाधवर उपस्थित होते.

किरण मेटकरला धनादेश सुपूर्द करताना सीईओ अविशांत पंडा व अधिकारीवर्ग.

# दिव्यांग दिन विशेष

| | | |
|---|---|---|
| 1 | कुष्ठरोग दिन | 31 जानेवारी |
| 2 | बहुविकलांग दिन | 15 मार्च |
| 3 | कंपवातरोग दिन | 11 एप्रिल |
| 4 | अधिक रक्तस्त्राव दिन | 17 एप्रिल |
| 5 | थेलेसेमिया दिन | 8 मे |
| 6 | सिकलसेल दिन | 19 जून |
| 7 | कर्णबधीर दिन | 28 सप्टेंबर |
| 8 | मानसिक आजार दिन | 10 ऑक्टोबर |
| 9 | बुटकेपणा दिन | 25 ऑक्टोबर |
| 10 | जागतिक अपंग दिन | 3 डिसेंबर |
| 11 | बौद्धीक अक्षमता दिन | 8 डिसेंबर |

# दिव्यांगाचे/अपंगत्वाचे 21 प्रकार

### पूर्णतः अंध (Blindness)



दृष्टिचा पूर्णपणे अभाव म्हणजेच पूर्ण दृष्टिहीन असणे, डोळे जन्मतः बंद असणे, हालचाल करताना अडचणी येतात.

### अंशतः अंध (Low Vision)



सामान्य दृष्टीपेक्षा कमी दिसणे.
दूरचे / जवळचे कमी दिसणे. पुस्तकातील मजकूर पाहताना, वाचताना, लिहिताना अडचणी येतात. उपचार करुनही डोळ्यांना बरोबर न दिसणे.

### मांसपेशीच क्षरण (Muscular Disability)



गटागटाने मांसपेशी कमकुवत होतात. उभे होताना हाताचा व गुडघ्याचा आधार घ्यावा लागतो. मुलींपेक्षा मुलांमध्ये या आजाराचे प्रमाण जास्त असतो.

### अस्थिव्यंग (Locomotor Disability)




सामान्य दृष्टीपेक्षा कमी दिसणे.
दूरचे / जवळचे कमी दिसणे. पुस्तकातील मजकूर पाहताना, वाचताना, लिहिताना अडचणी येतात. उपचार करुनही डोळ्यांना बरोबर न दिसणे.

### मानसिक आजार (Mental Illness)



असामान्य किंवा अस्वाभाविक वर्तन, खूप कमी बोलणे किंवा खूप जास्त बोलणे. भयानक स्वप्न पडणे भ्रम आभास असतो. कोणत्याही वस्तूता पटकन घाबरतात किंवा घाबरत नाही.

### अध्ययन अक्षमता (Learning Disability)



वाचन, लेखन, गणितीय क्रियांत अडचण, आकलन करण्यास अवघड जाते. अंक ओळखण्यात गोंधळ अक्षर उतरे लिहणे, शब्द गाळून वाचणे. काही मुलांमध्ये वर्तन समस्या असतात. कमी संभाषण दिसून येते. बुध्यांक सामान्य किंवा त्यापेक्षा जास्त राहू शकतो. विशिष्ट अध्ययनात अडचणी येतात

### स्वमग्न (Autism)



स्वतःच्याच विश्वात हरवलेले असतात. भाषिक कौशल्य कमी विकसित झालेले असतात. बदल न आवडणे, त्या बदलाला तात्काळ राग व्यक्त करणे. खेळणी, वस्तू यांसोबत अधिक रमतात.

### बहुविकलांग (Multiple Disability)



एक किंवा जास्त अपंगत्व असते. अशा बऱ्याच मुलांना चालताना, बोलताना उभे राहताना, शिशु असे दैनंदिन कार्य करताना समस्या असतात.

### बुटकेपणा (Dwarfism)



सामान्य मुलांपेक्षा खूप कमी उंची असते

### बौध्दिक अक्षमता (Intellectual Disability)



बौध्दिक क्षमता 70 पेक्षा कमी असते. सामाजिक कार्य, दैनंदिन व्यवहार करण्यास कठीण जाते. तार्किक प्रश्न सोडवताना अडचणी घेतात. नवीन वातावरणात जुळऊन घेतांना अडचणी येतात. काही मुलांना वर्तन समस्याअसतात.

### ॲसिड ॲटॅक (Acid Attack Victim)



ॲसिड ॲटॅकमुळे चेहरा, हात डोळे यांवर परिणाम होतो. त्वचा भाजल्यासारखी दिसते. चेहरा विद्रुप होतो.

### मल्टिपल स्क्लेरोसिस (Multiple Sclerosis )



हातापायातीत स्नायूमधील ताठरपणा किंवा कमजोरी संवेदनांमध्ये परिवर्तन होतो. स्नायूमध्ये शिथिलता येते व स्नायू काम करणे कमी करतात. मलमूत्र क्रियांवरीत नियंत्रण कमी होते व कार्य कमी होते.

# दिव्यांगाचे/अपंगत्वाचे 21 प्रकार

### कर्णबधिर (Hearing Impairment )



कोणताही आवाज ऐकू न येणे. कमी ऐकू येणे.

### कुष्ठरोग (Leprosy Cured Persons)



हा सावकाश पसरणारा जिवाणूजन्य आजार आहे. त्वचेवर चट्टे, काळे डाग असतात. हात, पाय, बोटे सुन्न पडतात.

### मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)



मेंदूमध्ये सेंट्रल नर्व्हस सिस्टिमध्ये विकृती झाल्याने हा आजार होतो.

### वाचा दोष (Speech and Language Disability)



अडखळत बोलणे, स्पष्ट न बोलणे, शब्दांची तोडफोड करणे. बोलताना शब्द मागे पुढे करणे, त्यात तारतम्य नसणे यालाच वाचा दोष असे म्हणतात. जीभ जाड असणे, जिभेला शेंडा नसणे, तोतरे बोलणे टाळूला छिद्र असणे Cleft Palate.

### मेंदूचा पक्षाघात (Cerebral Palsy)



हालचालींवर नियंत्रण नसते. अवयवांमध्ये ताठरता असते. मेंदूचा शरीरावर ताबा राहत नाही. हालचालीची क्षमता कमी असते.

### थैलासीमिया (Thalassemia)



रक्ताची कमतरता वारंवार रक्त पुरवावे लागते चेहरा सुकलेला असतो. वजन वाढत नाही. श्वास घेण्यास त्रास होतो. वारंवार आजारी पडतात.

### अधिक रक्तस्त्राव (Hemophilia)



हा आनुवंशिक रक्तविकार आहे. रक्त वाहिन्यांतील बिघाडामुळे हा रोग होतो. या मध्ये रक्तस्त्राव होतो. जखमा झाल्यास अधिक रक्तस्त्राव होतो. कधी कधी रक्तस्त्राव थांबत नाही. रक्तरवाव बंद न झाल्याने शरीराचा भाग फुगतो.

### सिकल सेल (Sickle Cell Disease)



रक्ताचे प्रमाण कमी असणे. रक्ताच्या कमतरते मुळे शरीराचे अवयव अशक्त होतात. शरीरातील पेशींचा आकार विळ्यासारखा होतो. हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होउन थकवा जाणवतो.

### कंपवात रोग (Parkinson's Disease)



डोपामिन रेणूच्या अभावामुळे रोग्याला कंप सुटतो. हालचाली संथ होतात, स्नायू ताठर होतात. वजन कमी होत जाते. 50 ते 60 वयाच्या दरम्यान होतो.

## स्व. अंबादास वैद्य मतिमंद मूकबधिर बालगृह अनाथालय

वझ्झर फाटा, तालुका अचलपूर, जिल्हा अमरावती.

या बालगृहाची मान्य संख्या 60 असून 64 मुले प्रवेशित आहेत. हे सर्व प्रवेशित मुले-मुली या अठरा वर्षावरील अनाथ दिव्यांग आहेत. या सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक श्री शंकर बाबा पापळकर यांनी स्वतः चे नाव पालक म्हणून दिलेले आहे. त्यांनी अनेक प्रवेशित मुला मुलींचे विवाह लावून दिले आहेत तसेच अनेक मुला मुलींना नोकरी मिळवून दिली आहे. अतिशय निसर्ग रम्य परिसरामध्ये हे बालगृह वसलेले आहे.दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील हे एक मोठे कार्य आहे.



तरुण भारत

Nagpur Main | 2022-10-23 | Page-8

epaper.tarunbharat.net

दिव्यांग रूपाचा पहिला पगार शंकरबाबांच्या चरणी

Powered by iDocuments






लोकमत

शंकरबाबांच्या रूपाला मिळाले पहिले वेतन

१०० टक्के पोलिओग्रस्त, सख्ख्या बापाने झिडकारले, अनाथांच्या नाथाने सावरले

जिल्हाधिकारी देणार इलेक्ट्रिक सायकल

New Delhi
Page No. 4 Oct 23, 2022
Powered by: erelego.com






प्रतिदिन



लोकमत

# शंकरबाबांच्या गांधारीला अरुणाचलच्या मुख्यमंत्र्यांचे आमंत्रण

शंकरबाबांची मानसकन्या गांधारी

- स्वागतगीत गाणार गांधारी
- अमरावती जिल्ह्याला मिळवून दिला बहुमान

लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा : अनाथांचे नाथ शंकरबाबा पापळकर यांची मानसकन्या गांधारीला अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी स्वागतगीत म्हणण्यासाठी आमंत्रित केले आहे. जिल्ह्याला तिच्या रूपाने बहुमान प्राप्त झाला आहे.

माय होम इंडिया या संस्थेच्या 'वन इंडिया अवॉर्ड २०२२' या कार्यक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी ईशान्य भारतातील एका व्यक्तीला पुरस्कार दिला जातो. यंदा अरुणाचल प्रदेशामधील न्यिशी जमातीच्या श्रद्धा पुनर्जागरण चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते श. तेची गुबिन यांना मुख्यमंत्री पेमा खांडू यांच्या हस्ते हा पुरस्कार देणार आहे. हा सोहळा १५ डिसेंबर रोजी मुंबईच्या दादर पश्चिम येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात होत आहे. या कार्यक्रमाचे स्वागतगीत गाण्याचा बहुमान वझ्झर फाटा (ता. अचलपूर) येथील स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग बेवारस बालगृहातील गांधारी हिला मिळाला आहे. ती 'ऐ मेरे वतन के लोगों' हे गीत सादर करणार आहे. यासाठी तिला भाजप महासचिव सुनील देवधर यांनी आमंत्रित केले. अंध असलेली गांधारी अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असून म्युझिक थेरपीच्या माध्यमातून रुग्णांना आनंद देत आहे. २५ वर्षांपूर्वी पंढरपूर येथील चंद्रभागेच्या तीरावरून तिला वझ्झर येथील अनाथांचे नाथ शंकरबाबा पापळकर यांच्या ताब्यात आजीवन पुनर्वसनाकरिता न्यायालयाच्या आदेशावरून देण्यात आले होते. शंकरबाबांनी आई-वडिलांची भूमिका चोख बजावत तिला योग्य शिक्षण दिले. अंध विद्यालयामध्ये ती बारावी झाली. त्यानंतर अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय, मुंबई येथील संगीताच्या सात विशारद परीक्षा प्रथम क्रमांकांनी उत्तीर्ण केल्या.

Hello Amravati
Page No. 1 Dec 13, 2022
Powered by: erelego.com

## दिव्यांग सेवेला समर्पित जीवन

असिसी आशादिप विशेष मुलांची शाळा, अमरावती





# दिव्यांग शाळेतील भोजनाचा "अमरावती पॅटर्न"

अमरावती जिल्ह्यातील निवासी दिव्यांग शाळांमध्ये दिले जाणाऱ्या भोजनासाठी सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून एक नाविन्यपूर्ण आणि विशेष योजना राबवली जात आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना सकाळी नाष्टा, दहा- अकरा वाजता जेवण, दुपारी नाष्टा आणि सायंकाळी पुन्हा जेवण याप्रमाणे भोजनाची व्यवस्था केली जाते. भोजनाच्या मेनूमध्ये चपाती, भाजी, वरण-भात, सॅलड आणि गोड पदार्थ यांचा समावेश असतो. भोजन व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व निवासी शाळांच्या मुख्याध्यापक / कर्मचारी यांचा Amaravati Divyang Shala Bhojan Group या नावाने Whats Group तयार करण्यात आलेला आहे. या ग्रुपवर प्रत्येक शाळेला दररोजच्या दिलेल्या भोजनातील मेनूंचे फोटो आणि विद्यार्थी भोजन करत असताना चे फोटो पाठविणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या भोजनावर जिल्ह्यातील सर्व शाळांचे लक्ष राहते. कोणत्या शाळेमध्ये कोणता मेनू दिला आहे हे सर्व मुख्याध्यापकांना समजते. यामध्ये एक विशेष बाब घडून आली. दिव्यांग शाळांमध्ये विद्यार्थ्यांना चांगले भोजन देण्याची सर्व शाळांमध्ये जणू काही निकोप स्पर्धा निर्माण झाली आहे. या उपक्रमामध्ये सर्व शाळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला आहे.

या उपक्रमामुळे अमरावती जिल्ह्यातील निवासी दिव्यांग शाळेतील भोजनाचा दर्जा सुधारला आहे. आणि सकस आणि रुचकर भोजनामुळे विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले आहे. या उपक्रमाचे विद्यार्थ्यांच्या पालकांनी कौतुक केले आहे.









सकाळ

नवे आदेश : दररोज टाकावी लागणार भोजनाची छायाचित्रे

## दिव्यांगांच्या शाळेतील जेवणावर 'वॉच'

अमरावती, ता. १ : जिल्ह्यातील बहुतांश दिव्यांग शाळांमधील विद्यार्थ्यांना पोटभर व नियमानुसार भोजन दिले जात नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आता दररोजच्या भोजनाची छायाचित्रे व्हॉट्सॲप ग्रुपवर अपलोड करण्याची नवीन योजना जिल्हा समाजकल्याण अधिकारी राजेंद्र जाधवर यांच्या पुढाकारातून तयार करण्यात आली आहे. त्यानुसार मागील काही दिवसांपासून दररोजचे मेन्यू, तसेच भोजनाची छायाचित्रे अपलोड केली जात आहेत. विशेष म्हणजे जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागाची ही आगळी वेगळी योजना आता विभागीय स्तरावर आदर्शवत ठरण्याचे संकेत आहेत. त्यानुसार लवकरच विभागस्तरावर सुद्धा याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

[illegible]

नियमानुसार विमुक्तांना सकस आहार वेळच्यावेळी देण्यासाठी संस्थाचालकांना शासनाकडून अनुदान दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना सकस आहार देण्यासाठी आम्ही आग्रही आहोत. प्रत्येक जेवणात सलाद देण्याच्या सूचना दिल्या आहेत. या कल्पनेनी दररोज छायाचित्रे अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचे सकारात्मक परिणाम सुद्धा दिसून येत आहे.

- राजेंद्र जाधवर, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.

### असा आहे आहाराचा कार्यक्रम

- दिव्यांग शाळांमधील विद्यार्थ्यांना सकाळी नाश्ता, सकाळी १० ते ११ या वेळेत जेवण, दुपारी नाश्ता तसेच सायंकाळी ६ ते ८ या वेळेत रात्रीचे जेवण देणे गरजेचे आहे. जेवणात सलाद असणे गरजेचे आहे.

# महत्त्वाचे शासन निर्णय/ परिपत्रके

| अ.क्र. | विषय | शासन निर्णयाचा विभाग / दिनांक |
|---|---|---|
| 1 | दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबवणे बाबत | 1) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 2 डिसेंबर 2021<br>2 ) दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 8 मार्च 2023 |
| 2 | लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करुन देणे बाबत | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिनांक 5 ऑक्टोबर 2021 |
| 3 | दिव्यांगांना स्वतंत्र शिधा पत्रिका देणेबाबत | अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 21 डिसेंबर 2020 |
| 4 | मानसिक विकलांग/ शारीरिक दुर्बलता असणाऱ्या अपत्याच्या नावाचा समावेश शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन प्रदान आदेशामध्ये करण्याबाबत | वित्त विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 8 ऑक्टोबर 2018 |
| 5 | केंद्र शासनाच्या नि: समर्थ ( दिव्यांग) व्यक्ती हक्क अधिनियम 2016 मधील तरतुदीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती / नगरपरिषदांच्या क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींसाठी पाच टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत | नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 10 मे 2018 |
| 6 | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 अनुसार दिव्यांगत्वाचे एकूण 21 प्रवर्गातील दिव्यांग लाभार्थी यांना राज्य व यंत्रणांच्या योजना, सवलती, लाभ, अनुदान वा तस्सम इतर फायदे यांचा लाभ घेण्याकरता ग्राह्य ठरविणेबाबत | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 13 सप्टेंबर 2022 |
| 7 | पंचायत राज संस्थांनी त्यांच्या स्व उत्पन्नातून पाच टक्के निधीतून घ्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजना व खर्चाबाबत मार्गदर्शक सूचना | ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 25 जून 2018 |
| 8 | पंचायत राज संस्थांनी त्यांच्या विभाग स्तर जिल्हास्तर तालुकास्तरावर व ग्राम स्तरावर दिव्यांगासाठी तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करणेबाबत | ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई 10 डिसेंबर 2020 |
| 9 | दिव्यांग कल्याण विभागासाठी पदे निर्माण करणेबाबत | दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय मुंबई 4 जानेवारी 2023 |
| 10 | दिव्यांग कल्याण विभागाची स्थापना याबाबतची अधिसूचना | सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक 15 डिसेंबर 2022 |
| 11 | विशेष सहाय्य योजना<br>1 संजय गांधी निराधार अनुदान योजना<br>2 श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना<br>3 इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना<br>4 इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना<br>5 इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना | सामाजिक न्याय व विशेष सहा विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 20 ऑगस्ट 2019 |
| 12 | शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलांमध्ये किंवा मुलींमध्ये मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता इत्यादी निर्माण झालेली असल्यास त्यांना संपूर्ण हयात भर कुटुंब निवृत्ती वेतन देण्याबाबत | वित्त विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 16 मे 1990 |

# 525 फुटांची रांगोळीची इंडिया रेकॉर्ड बुक मध्ये नोंद

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव प्रसंगी श्री बुलिदान राठी मूकबधिर विद्यालय अमरावती येथील  मूकबधिर विद्यार्थ्यांनी  रेखाटलेल्या 525 फुटांची रांगोळीची इंडिया रेकॉर्ड बुकमध्ये  नोंद झाली आहे.








आज़ादी का अमृत महोत्सव

इतनी शक्ति हमें देना दाता | मन का विश्वास कमजोर हो ना

हम चलें नेक रस्ते पे | हमसे भूलकर भी कोई भूल हो ना
इतनी शक्ति हमें देना दाता | मनका विश्वास कमजोर हो ना

दूर अज्ञान के हो अँधेरे | तू हमें ज्ञान की रौशनी दे
हर बुराई से बचके रहें हम | जीतनी भी दे भली ज़िन्दगी दे
बैर हो ना किसी का किसी से | भावना मन में बदले की हो ना
हम चलें नेक रस्ते पे | हमसे भूलकर भी कोई भूल हो ना

इतनी शक्ति हमें देना दाता | मनका विश्वास कमजोर हो ना

हम न सोचें हमें क्या मिला है | हम ये सोचें किया क्या है अर्पण
फूल खुशियों के बांटें सभी को | सबका जीवन ही बन जाए मधुबन
ओ.. अपनी करुणा का जल तू बहाके कर दे पावन हर एक मन का कोना
हम चलें नेक रस्ते पे | हमसे भूलकर भी कोई भूल हो ना

इतनी शक्ति हमें देना दाता | मनका विश्वास कमजोर हो ना

# जिल्हा समाज कल्याण दिव्यांग विभाग

## जिल्हा परिषद - अमरावती